# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षणाविषयीचे विचार व योगदान

**वैदेही परेश भागवत,** कमला कॉलेज कोल्हापूर.

---

प्रस्तावना:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताचे शिल्पकार नव्हते तर समाज सुधारक म्हणूनही त्यांनी मोठे योगदान दिले आहे.भारतातील प्रमुख महात्मे, स्त्रीवादी नेते, समाज सुधारक यांची जर आपण नावे घेतली तर पहिले नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे येईल. असे म्हणतात, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो परंतु स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगती मागे फक्त एकच महापुरुषाचा हात आहे आणि तो म्हणजे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर . डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा स्त्रीवादी विचारांवर पडलेला प्रभाव व त्यातून निर्माण झालेली समाज परिवर्तनाची चळवळ ही विसाव्या शतकात अतिशय महत्त्वपूर्ण अशी चळवळ होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित स्त्रियांबरोबरच भारतातील बहुजन स्त्रीविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली होती त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून चळवळ उभारून स्त्रियांना मानसन्मानांचे स्थान मिळवून देण्याची महत्त्वाची भूमिका बजावली होती. परंपरागत समाज व्यवस्था व हिंदू धर्मशास्त्राने स्त्रियांना ज्ञान संपादनाचा अधिकार नाकारला होता. हिंदू धर्म व्यवस्थेने स्त्रीला विश्वासास अपात्र, दुष्ट, चंचल, अविचारी आणि गौण मानले होते स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार मानला जात होता एवढेच नाही तर स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे अकाली वैधव्य समजले जात होते. त्या काळात वयाने मोठ्या असलेल्या व्यक्तीसमोर पतीशी वा अन्य पुरुषाशी बोलणे देखील असाभ्यमनाचे समजले जात होते स्त्रीच्या बुद्धीने वागणे म्हणजे सर्वनाश असा समज होता स्त्रीला ज्ञान देणे म्हणजे वेड्याच्या हाती कोलीत देण्यासारखेच आहे असा त्या काळी समज होता. थोडक्यात भारतीय समाज व्यवस्थेत धर्म आणि परंपरा यांनी स्त्रियांना पूर्णपणे गुलाम बनवले होते. तेव्हा मानवतेला अपमानित करणारी आणि संपूर्ण देशाला दुबळी करणारी अन्यायकारक समाज व्यवस्था जर उलथून पाडायची असेल तर शिक्षण हे क्रांतीचे पहिले पाऊल आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते म्हणूनच त्यांनी स्त्रियांच्या शिक्षण विषयक विचारांना चालना देऊन भारतीय स्त्रियांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले.

उद्देश:-

1.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रीशिक्षण विषयक विचारांचा सखोल अभ्यास त्यांच्या भाषणातून, लेखनातून आणि कार्यातून करणे.

2.नवीन पिढीला बाबासाहेबांच्या स्त्री शिक्षण विषयी विचारांची ओळख करून देणे.

3.स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान हक्क मिळवून देण्यात बाबासाहेबांच्या विचारांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

4.स्त्री शिक्षणात बाबासाहेबांचे योगदान याविषयीचा अभ्यास करणे.

5.स्त्री शिक्षणामुळे समाजात झालेला बदलांचा अभ्यास करणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार :-

- समाजसुधारणा- त्यांच्या मते स्त्री शिक्षण हा समाज सुधारणेचा एक महत्त्वाचा भाग होता. शिक्षित स्त्रिया या आपल्या कुटुंबामध्ये सामाजिक बदल घडवून आणू शकतात असे त्यांचे स्पष्ट मत होते.
- स्त्री सक्षमीकरण- स्त्री शिक्षणाद्वारे स्वावलंबी बनू शकते तसेच शिक्षित स्त्रिया राष्ट्राची प्रगती व विकासात सक्रिय सहभाग घेऊ शकतात असे त्यांना वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षणातील योगदान :-

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री शिक्षणासाठी शिक्षण संस्थांची स्थापना केली त्यामध्ये दलित महिलांच्या शिक्षणासाठी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या.
- समाज जागृती करिता अनेक व्याख्याने, ग्रंथाद्वारे स्त्री शिक्षणाचे महत्त्व लोकांमध्ये पसरवले.
- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय पातळीवर स्त्रियांसाठी लढा दिला अनेक कायदे त्यांनी स्त्रियांच्या संरक्षणासाठी बनवले.
- भारतीय संविधानात स्त्री शिक्षणासाठी अनेक तरतुदी समाविष्ट करण्यामध्ये त्यांचा मोठा हात होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले त्यांना वाटत असे की, स्त्री केवळ घरातील काम करणारी एक व्यक्ती नव्हे तर ती समाजाचा एक महत्त्वपूर्ण असा घटक आहे.

- समाजात समतोल विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते हजारो वर्षापासून शिक्षण नाकारलेल्या कनिष्ठ जातींमध्ये अज्ञान आणि निरक्षरता होती त्यामुळेच उच्च जातीमधील लोक हलक्या प्रतीचे कामे स्वतः न करता कनिष्ठ जातींकडून सक्तीने करून घेत असत. आंबेडकरांनी कनिष्ठ जातींना त्यांच्या या दयनीय स्थितीचे कारण शिक्षणाचा अभाव आहे याची जाणीव करून दिली.भारतीय समाज रचना मानवाला अपमानित करणारी आणि दुबळी करणारी अशी बनली होती या समाज रचनेत जर अमुलाग्र बदल घडवून आणायचा असेल तर त्यासाठी शिक्षण हेच महत्त्वपूर्ण हत्यार ठरेल असे बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. त्यामुळेच त्यांनी 'शिका' पासून सुरुवात केली कारण संघटन ही त्याशिवाय नाही आणि संघर्ष ही नाही असे त्यांचे मत होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास हतबल होऊन जिवंतपणे दुसऱ्याचा गुलाम बनतो.'तसेच अशिक्षित व्यक्तीचे आहे.

शिक्षण घेण्याचा अधिकार सर्वांना आहे शिक्षण घेण्याची क्षमता ही प्रत्येकात आहे कोणीही जन्मताच बुद्धिमान नसतो शिक्षणाने बुद्धीचा विकास होतो मुलींना शिक्षणाचे संधी मिळाली तर ती सुद्धा स्वतःची पात्रता निश्चितपणे सिद्ध करू शकेल .त्याकरिता समाजातील प्रत्येक मुलीने शिक्षण घेतले पाहिजे असे विचार बाबासाहेबांचे होते. मुलींना शिक्षण नाकारले तर 50% समाज हा अज्ञानी तसेच अशिक्षित राहील आणि समाजाचा समतोल विकासाच्या विकासासाठी स्त्रियांचे शिक्षण हे महत्त्वाचे आहे असेही बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षणविषयक विचार:-

महात्मा ज्योतिबा फुले यांना बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या गुरुस्थानी मानत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्योतिबांचा शिक्षण संदेश कायम स्मरणात ठेवला. 'शिका , संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश लोकांसमोर ठेवला. डॉ. बाबासाहेबांनी प्रचंड प्रमाणात वाचन, मनन आणि चिंतन केले भारतीय संविधानाची निर्मिती केली आणि ती निर्मिती करीत असताना त्यांना स्त्रिया आणि शूद्रातीलशुद्रांच्या शिक्षणासंबंधी, विकासासंबंधी अनेक तरतुदी करून ठेवल्या त्यांच्या मते स्त्रिया व शुद्रातीशूद्र हे शिक्षण घेतल्यानंतर वाचू लागतील वाचल्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील अनेक बाबींचा उलगडा होईल, हिंदू धर्माने स्त्रिया शुद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार का नाकारला होता त्याचा शोध लागेल आणि तो शोध लागल्यामुळे स्त्रिया हिंदू धर्मातील गुलामी ते ठोकरुन देतील. देव धर्म या संकल्पनेतून स्वतःची मुक्तता करून विज्ञानवादी, बुद्धी प्रामाणिकवादी होत स्वतःच्या व समाजाच्या विकासाचा मार्ग सुकर करतील शिक्षणाच्या बाबतीत त्यांचे सूत्र हे शिक्षणातून समाज क्रांती असे होते.

- स्त्री शिक्षणासाठी सभा परिषदांमधून प्रबोधन:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक सभा आणि परिषदा आयोजित केल्या. या सभांमध्ये त्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व विशद केले त्यांनी स्त्री शिक्षणावर अनेक लेख आणि भाषणे केली आणि लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे महान कार्य त्यांनी केले

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी अतिशय महत्त्वपूर्ण कार्य केले उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर इसवी सन 1920 मध्ये बाबासाहेब भारतात आले त्यावेळी कामाठीपुरा,सातारास्ता,परळ येथील दगडीचाळ ,लोखंडीचाळ, घोड्याच्या बागेतील अस्पृश्य वस्त्यांमध्ये लोकजागृतीसाठी त्यांनी अनेक भाषणे दिली. स्त्रियांनी देखील भाषणे ऐकावीत असे त्यांना वाटत होते. आपल्या भगिनींनी शिक्षण घ्यावे उच्चवर्गीय स्त्रियांप्रमाणे दिसावे ,वागावे स्वाभिमानाने जगावे अशा प्रकारचे विचार ते आपल्या भाषणातून नेहमीच मांडत असत. स्त्रियांच्या प्रगतीवरून समाजाच्या प्रगतीचे मोजमाप ते करीत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी विद्यार्थी दशेपासूनच स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला होता. औरंगाबाद येथे मिलिंद विद्यालय स्थापन करून त्यात त्यांनी मुलींना प्रवेश दिला व विद्यालयात जास्त मुलींना येता यावे हा विचार करून महाविद्यालय ते शहर अशी बस सेवा त्यांनी सुरू केली. स्त्रियांच्या प्रगतीच्या आड त्यांचे लग्न येतात हे बाबासाहेबांनी बरोबर ओळखले म्हणूनच लग्न लवकर करून वैवाहिक जीवन त्यांच्यावर लादू नका असेही ते त्यांच्या भाषणातून नेहमीच सांगत असत.

- स्त्री शिक्षणामुळे समाजाची प्रगती साध्य होण्यास मदत:-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि भारताने लोकशाही समाजव्यवस्था स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रातील स्त्रिया व अ ब्राह्मणांना मोठ्या प्रमाणात शिक्षणाची संधी मिळाली त्यामुळे त्यांना आपल्या अस्मितेची आणि अस्तित्वाची जाणीव झाली. या जाणिवेंमधून संवेदनिक व नैसर्गिक हक्क अधिकाराची मागणी होऊ लागले. महाराष्ट्रातील आज सर्व आघाड्यांवर पुरुषांच्या बरोबरीने सर्व शक्तीनिशी स्त्रिया दिसून येण्याची रहस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार सूत्रात

दडलेले दिसते. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा पुरेपूर उपयोग करीत महाराष्ट्रातील स्त्रियांनी स्वतःच्या अस्तित्वाचा लढा पुकारलेला दिसून येतो त्यामागे सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्यासारख्या अद्वितीय महिलांच्या देखील प्रेरणा आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर फक्त दलितांचेच नव्हे तर त्यांनी समग्र मानव जातीच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले. स्त्री-पुरुषांच्या बुद्धिमत्ता बुद्धीमध्ये कमी जास्त काही नाही जगातील सर्व धर्मग्रंथ पुरुषांनीच लिहिलेली आहेत त्यांनी स्त्रियांचे सर्व नैसर्गिक हक्क काढून घेतले आहे व स्त्रीला गुलाम बनवले आहे वास्तविक स्त्री ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे. अपत्य प्रेमाचे वरदान निसर्गतः स्त्रीलाच प्राप्त झालेले आहे याही बाबतीत स्त्री ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठच आहे मात्र आजही समाज स्त्रीला बरोबरीचे स्थान देण्यास नकारात्मक आढळून येतो वास्तविक स्त्रियांची प्रतिमा जोडी फुलेल आंतरिक शक्ती जेवढी सकारात्मक होईल तेवढे मानव जातीचे कल्याण होणार आहे.

° स्त्रियांवरील अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी शिक्षण आवश्यक:-

महाड संग्राम परिषदेच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 5000 स्त्रियांनी सहभाग घेतला. या सभेत त्यांनी महिलांना उद्देशून काही उपदेश केला तो अतिशय साधा व सारगर्भ अशा प्रकारचा होता एक महान पंडित आणि विद्वान सोपे बोलू शकत नाही हा समज त्यांनी त्या वेळेला खोटा पाडला.

° शिक्षणाला नीतिमत्तेची जोड देण्याची आवश्यकता:-

शिक्षणाला नीतिमत्तेची जोड ही आवश्यक आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे यांचे स्पष्ट मत होते भारतीय समाजातील स्त्रियांची भावनिक, मानसिक, शारीरिक जीवनाची गुणवत्ता सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवून त्यासाठी जीवनाच्या सामाजिक, मानसिक सांस्कृतिक, आर्थिक तसेच राजकीय अशा सर्व क्षेत्रात स्त्रियांसाठी समानता प्रस्थापित करून त्यांचे समाजातील स्थान व दर्जा वाढवण्यासाठी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार बाबासाहेबांनी केला होता. त्यासाठी बाबासाहेबांनी अखिल भारतीय परिषद आयोजित करून त्यात स्त्री शिक्षणावर भर देणारा ठराव मांडण्यात आला ज्या ठिकाणी शाळा असेल तेथील लोकांनी मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण दिलेच पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. दिनांक 27 12 1927 रोजी बाबासाहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्त्रियांना उद्देशून म्हटले, मुलींनाही शिक्षण दिलेच पाहिजे ज्ञान आणि विज्ञान या गोष्टी पुरुषांसाठीच नाही तर त्याला स्त्रियांनाही आवश्यक आहेत तसेच याच भाषणात पुढे ते म्हणाले पुढील पिढी जर आपल्याला सुधारायची असेल तर मुलींना शिक्षण हे मिळालेच पाहिजे. खान तशी माती असा निसर्ग नियमांचा संकेत देऊन स्त्री शिक्षणाचा विचार त्यांनी जनतेला दिला. दलित महिला परिषदेला संबोधित करताना बाबासाहेब म्हणतात की, तुम्ही स्वतः प्रथम शिक्षित वहा आपल्या मुलींना शिकवा त्यामुळे देशाचा विकास होईल तुमच्या अस्मितेचा देखील विकास होईल तुम्ही माणूस आहात अशी तुम्हाला ओळख होईल. शिक्षण वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही स्त्री शिक्षणाविषयी बोलताना बाबासाहेब पुढे म्हणतात एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती सुधारते परंतु एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंबाची सुधारणा होते यात माहेरचा आणि सासरचा देखील समावेश असेल. स्त्रियांच्या उच्च शिक्षणाबाबतही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे काही विचार होते ते म्हणत, मुलींना उच्च शिक्षण दिले जाईल ते व्यवहार उपयोगी असले पाहिजे ते जीवनाला उपयुक्त असेच असले पाहिजे तसे ते राष्ट्रपयोगी ही असले पाहिजे ते वारंवार असे सांगत की शिक्षणाला नीतिमत्तेची जर जोड असेल तर उत्तम चारित्र्य असलेले व्यक्तिमत्व घडेल

**निष्कर्ष:-**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे मुख्य हत्यार आहे त्याचा योग्य उपयोग झालाच पाहिजे असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक सुधारण्याची व स्त्री शिक्षणाची दिव्य परंपरात महाराष्ट्राला लाभली त्याचा लाभ महाराष्ट्रातील स्त्री चळवळीला झालेला दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक समाज सुधारक होते तात्कालीन समाजात होणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचाराची दखल त्यांनी घेतली होती त्या विरोधात लढाई त्यांनी लढली होती त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नात होते. स्त्रियांना शिक्षण द्यावे व स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि माणूस म्हणून अभिमानाने जगता यावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखातून, आपल्या भाषणातून, परिषदांमधून, ग्रंथातून प्रबोधन केलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री शिक्षणाला दिलेले योगदान अतुलनीय आहे त्यांनी स्त्री शिक्षणाला एक सामाजिक चळवळ म्हणून पाहिले आणि त्यासाठी एक सामाजिक आणि त्यासाठी अथक प्रयत्न त्यांनी केले त्यांच्या विचारांमुळे आज स्त्री शिक्षणाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

**सारांश:-**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीने समाजाचा समतोल विकास हा शिक्षणावर अवलंबून होता त्यांच्या मते शिक्षण हे केवळ ज्ञान देण्याचे नव्हे तर समाजातील असमानता दूर करण्याचे एकमेव साधन होते. विशेषतः स्त्रियांच्या शिक्षणावर भर

देऊनच समाजाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाला महत्त्वाचे स्थान देत स्त्रियांना समाजात समान हक्क मिळवून देण्याचे तसेच स्त्री शिक्षणासाठी अनेक प्रयत्न केल्याचे दिसून येते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मते स्त्री शिक्षणामुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते शिक्षण ही स्त्रियांना कुटुंबाचे आणि समाजाचे कल्याण करण्यास मदत करते तसेच अनेक समस्यांचे निराकरण करण्यास शिक्षणामुळे मदत होते. स्त्री पुरुष समानता आणण्यास शिक्षण मदत करते शिक्षणाबद्दल बरोबरच नीतिमत्तेची जोड आवश्यक आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

**संदर्भ ग्रंथसूची:-**

१)विद्युत भागवत स्त्रीमुक्ती प्रवक्ते लेख प्राध्यापक हरी नरके प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई 2016

२) धनंजय किर, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन पुणे 2014

3) रिव्ह्यू ऑफ रिसर्च डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयीची योगदान प्राध्यापक संजय जिजाऊ पाटील सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख क्रांतिवीर नवल भाई कला विद्यालय नवल नगर जिल्हा धुळे.

4) www.google.com